दिनांक २८/११/२०२२

## प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से. ऋषिकेश गंगाधर वाडेकर, वय 22 वर्षे, पद-विद्युत सहाय्यक, नेमणुक-विज वितरण कं. उपकेंद्र औराळा, तालुका-कन्नड जिल्हा-औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये. 5000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे देवगांव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | ऋषिकेश गंगाधर वाडेकर, वय 22 वर्षे, पद-विद्युत सहाय्यक, नेमणुक-विज वितरण कं. उपकेंद्र औराळा, तालुका-कन्नड, जिल्हा-औरंगाबाद, रा. लिंबाजी चिंचोली ता.कन्नड जिल्हा औरंगाबाद (वर्ग-4) |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 2000/-रुपये (यातील 3000/- रु. तक्रारदार यांनी पुर्वीच स्विकारले) |
| तपास अधिकारी | :- | श्री. दिलीप साबळे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वडिलांच्या शेतात वीज पंपासाठी नविन इलेक्ट्रीक मीटर व जोडणी बसवून देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या वडिलांचे नावावर असलेल्या शेतात वीज पंपासाठी नविन इलेक्ट्रीक मीटर व जोडणी बसवून देण्यासाठी आ.लो.से. वाडेकर यांनी तक्रारदार यांना 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी तक्रारदार यांचेकडुन पुर्वीच 3000/-रु. स्विकारलेले आहे. परत राहिलेले रुपये 2000/- लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 28/11/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, नमूद आ.लो.से. यांना पंच साक्षीदारा समक्ष तडजोडी अंती लाचेची रक्कम रुपये 2000/- स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे देवगांव रंगारी औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक दिलीप साबळे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं./भिमराव जिवडे, विलास चव्हाण, अशोक थोरात, चालक- दिपक सोनवणे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


28/11/22

**(मारुती शंकर पंडित)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**